जा.क्र.उमा२/कोवि/संचम मान्यता/१९ / 17463-75
शिक्षण उपसंचालक कार्यालय, कोल्हापूर
विभाग, कोल्हापूर
दिनांक- 31 JUL 2019

प्रति,

प्राचार्य/ मुख्याध्यापक,
मान्यताप्राप्त कायम विनाअनुदानित (अनुदानास पात्र घोषित केलेल्या उच्च माध्यमिक शाळा ) कनिष्ठ महाविदयालये कोल्हापूर विभाग,

विषय — सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाकरीता उच्च माध्यमिक शाळांच्या संच मान्यतेबाबत मान्यताप्राप्त कायम विनाअनुदानित (अनुदानास पात्र घोषित केलेल्या उच्च माध्यमिक शाळा ) कनिष्ठ महाविदयालये ,

संदर्भ- १)मा.शिक्षण संचालक (माध्य व उच्च माध्य) पुणे यांचे पत्र क्र.८५०१,दि.११/१०/२०१८
२) या कार्यालयाचे सन २०१७-१८ संच मान्यता परिपत्रक दिनांक २६/१०/२०१७
३) या कार्यालयाचे पदभरती बाबतचे परिपत्रक क्र. २५०३८-४२ दिनांक २६/१०/२०१८

सन २०१८-१९ ची उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविदयालयांची संच मान्यता करणेबाबतच्या सूचना संदर्भ क्र. १ नुसार देणेत आलेल्या आहेत.

सबब, या विभागातील सन २०१८-१९ ची उच्च माध्यमिक शाळा/ क.म.वि. च्या संच मान्यता गतवर्षीप्रमाणे संगणकीय पध्दतीप्रमाणे **(रिया इन्फोटेक, कोल्हापूर)** करणेत येणार आहे. यानुसार संच मान्यता करणेसाठी खाली दिलेल्या संकेतस्थळावर आपल्या कायम विनाअनुदानित, विना अनुदानित (अनुदानास पात्र घोषित कनिष्ठ महाविदयालय व स्वयंअर्थसहाय्यित उच्च माध्यमिक शाळेची माहिती भरणेत यावी. सदर माहिती भरताना खालील सर्वसाधारण सूचना विचारात घ्याव्यात.

संकेतस्थळ- **www.dydekop.org**
युजर आयडी- शाळेचा युडाएस पासवर्ड- शाळेचा युडाएस

१. सदरचे संकेत स्थळावर सर्व उपरोक्त प्रमाणे शाळांनी आपली माहिती परिपूर्ण भरुन घ्यावी.
२. **सदरचे संकेतस्थळावरील संच मान्यतेची लिंक ही गतवर्षीच्या संच मान्यतेपेक्षा वेगळी असलेने संच मान्यतेबाबतची सर्व माहिती (प्राथमिक माहितीसह सन २०११-१२ पासूनची तुकडी व पटसंख्या तसेच इतर माहिती) नव्याने भरावी लागणार आहे.**
३. सदरची माहिती भरताना सन २०१७-१८ च्या संच मान्यतेनुसार मंजूर विषय व या विषयांना मंजूर तुकडया व कार्यभार याप्रमाणे भरावी. तसेच विषयनिहाय माहिती भरताना सन २०१७-१८ मध्ये त्या विषयाला मंजूर असणा-या तुकडया इतकीच माहिती भरावी. विषयासाठी तुकडी संख्येत वाढ करु नये. यामुळे कोणताही कार्यभार व पद वाढणार नाही याची दक्षता घ्यावी.
४. विषयनिहाय मंजूर पदे व प्रस्तावित पदे यांची अचूक माहिती भरावी.
५. शासन निर्णय दि. २३/६/२०१७ नुसार सर्व पदे पवित्र प्रणाली मधून भरावयाची असलेने नव्याने कोणत्याही नियुक्त्या (सी.एच.बी. / स्वंयअर्थसहा.वगळता) करता येणार नाहीत. अशा नियुक्त उमेदवारांची नावे संच मान्यतेमध्ये समाविष्ट करु नये. याबाबत संदर्भ क्र. ३ चे परिपत्रक पहावे.
६. सन २०१८-१९ च्या संच मान्यतेमध्ये कार्यभारानुसार येणारी पूर्णवेळ व अर्धवेळ पदे ही सन २०१७-१८ च्या संच मान्यतेमधील पूर्णवेळ व अर्धवेळ पदाशी तुलनात्मक पडताळून कमी/जादा होत असलेस त्याची खातरजमा करावी.
७. माहिती भरताना चुकीची माहिती भरली जाणार नाही, योग्य व परिपूर्ण माहिती भरली जाईल याची याची दक्षता घ्यावी.
८. विषयनिहाय व तुकडीनिहाय पटसंख्या भरताना ज्या विषयांच्या जादा तुकडया आहेत यामध्ये प्रथमत: पहिल्या तुकडया पूर्ण क्षमतेने भरलेनंतरच शेवटच्या तुकडीत उर्वरीत पटसंख्या भरावी.
९. एकापेक्षा जास्त तुकडया असल्यास इयत्तानिहाय, तुकडीनिहाय व विषयनिहाय कार्यभार तक्ता जोडावा.

**सदर संच मान्यता प्रस्तावासोबत खालीलप्रमाणे माहिती फाईलमध्ये सादर करावी.**

१. संच मान्यतेची सन २०१८-१९ ची भरलेली कच्ची प्रत (ड्राफट प्रिंट) - तपासणीसाठी
२. २.सन २०१८-१९ साठीचा इयत्ता, तुकडी , विषयनिहाय कार्यभार तक्ता
३. सन २०१३-१४ व २०१७-१८ ची मान्य करुन दिलेली ऑनलाईन/ऑफलाईन संच मान्यता प्रती
४. सन २०१३-१४ च्या संच मान्यतेनंतर देणेत आलेल्या सर्व वैयक्तिक मान्यतेच्या प्रती .
५. दि. ३०/९/२०१८ च्या पटसंख्येचा पटाबाबतचा मुख्याध्यापक/प्राचार्य यांचा अहवाल-
६. सरल डाटाबेस वरील विदयार्थी रिपोर्ट ( डिव्हीजनवाईज, स्ट्रिम वाईज, स्टँडर्ड वाईज –गोषवारा) प्रस्तावासोबत सादर करावेत. Student database - student portal – report - HM level- student report यामध्ये सदरचे रिपोर्ट मिळू शकतील.
७. शाळा/संस्था अल्पसंख्याक असल्यास - अल्पसंख्याक प्रमाणपत्र
८. मुख्याध्यापक/प्राचार्य यांचे मान्यतेचे पत्र

Scanned by CamScanner

९. संच मान्यतेमध्ये भरणेत आलेला विषयनिहाय कार्यभार, पट इ. माहिती शालेय दप्तरावरुन खात्री करुन भरणेत आलेली आहे. तसेच अ,ब, क तक्त्यात संबंधित शिक्षकांचे नावे दर्शविलेला कार्यभार हा त्या शिक्षकांनीच घेतला आहे. यामध्ये तफावत आढळल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी माझी राहील असे मुख्याध्यापक/प्राचार्य यांचे हमीपत्र सादर करावे.

१०. गतवर्षी मान्यता दिलेले व सन २०१८-१९ साठी सेवासातत्य दिलेले **अर्धवेळ/सीएचबी** शिक्षकांचे मान्यता प्रस्ताव सदर शिबीरावेळी सादर करावेत. ( सेवासातत्य ठराव, नियुक्ती आदेश, हजर रिपोर्ट, शैक्ष. अर्हता इ. )

वरील कागदपत्रे मुख्याध्यापक/प्राचार्य यांनी साक्षांकीत करावीत.

वरील प्रमाणे माहिती तसेच अन्य आवश्यक त्या माहिती, सन २०१८-१९ च्या भरलेल्या माहितीची प्रत तसेच वर नमूद कागदपत्रे यांची फाईल तयार करुन खाली नमूद दिनांकास संच मान्यता शिबीरास उपस्थित रहावे.

**संदर्भ क्र. १ च्या पत्रातील सूचनेनुसार सदर शिबीरावेळी संच मान्यता अंतिम करुन न घेतल्यास होणा-या नुकसानीची/परिणामांची सर्व जबाबदारी प्राचार्य/ मुख्याध्यापक यांची राहील. तसेच शिबीराशिवाय संच मान्यता करुन दिल्या जाणार नाहीत याचीही नोंद घ्यावी.**

**तसेच सन २०१८-१९ मध्ये ज्या अनुदानित/विनाअनुदानित व स्वयंअर्थसहाय्य उच्च माध्यमिक व कनिष्ठ महाविदयालये यांच्या अदयाप संच मान्यता प्रलंबित आहेत अशा उच्च माध्यमिक व कनिष्ठ महाविदयालयानी सुध्दा सदर शिबीरास उपस्थित राहून सन २०१८-१९ च्या संच मान्यता पूर्ण करुन घेणेची जबाबदारी प्राचार्य/मुख्याध्यापक यांची राहील.**

(सु.मा.आवारी)
शिक्षण उपसंचालक,
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर

प्रत- माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी-
शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, कोल्हापूर/सांगली/सातारा/रत्नागिरी/सिंधुदुर्ग
सर्व सहा. शिक्षण उपनिरिक्षक (उच्च माध्यमिक) जि.प. कोल्हापूर/सांगली/सातारा/रत्नागिरी/ सिंधुदुर्ग

प्रत- माहितीस्तव सविनय सादर
मा. आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
मा. शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, म.रा. पुणे १

**मान्यताप्राप्त कायम विनाअनुदानित (अनुदानास पात्र घोषित केलेल्या उच्च माध्यमिक शाळा ) कनिष्ठ महाविदयालये**

| अ. क्र | जिल्हा | दिनांक | शिबीर स्थळ व वेळ |
|---|---|---|---|
| १ | कोल्हापूर | ५/८/२०१९ | शिक्षण उपसंचालक कार्यालय, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर वेळ सकाळी १०.३० ते सायं.५.३० |
| २ | सांगली/सातारा | ६/८/२०१९ | |
| ३ | रत्नागिरी/सिंधुदुर्ग | ७/८/२०१९ | |

(सु.मा.आवारी)
शिक्षण उपसंचालक,
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर

Scanned by CamScanner